# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.६५७/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. दिनकर विष्णु पवार, रा. अनुष्का किराणा स्टोअर, शारदा सदन जवळ, देवळाली पाथर्डी रोड, पाथर्डी नाशिक, ता.जि. नाशिक | उपअभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक, ता.जि. नाशिक | कार्यकारी अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक, ता.जि. नाशिक |

**सुनावणी दिनांक -- २३/०४/२०२४**

१. **उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित |

२. **द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : १७/०८/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : मुदतीत माहिती मिळाली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : शास्ती करण्यात यावी. शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

३. **माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०८/०९/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०८/०९/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : कालावधी नमूद नाही.

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती**

नाशिक मनपा हद्दीतील पाथर्डी शिवार सर्वे नं.३/२,३/३ व ३/४ सदर क्षेत्रात पावसाळी पाण्याचा व क्षेत्रास लागून असे दोन पावसाळी पाण्याचे नाले आहेत ते दोन्ही नाले बुजवून लेवल करण्यात आले आहे त्या क्षेत्राला लागून जो नाला आहे तेथे १२ मिटर जुना देवळाली रोड आहे तो बुजवून लेवल करा असा आदेश मनपा तर्फे देण्यात आला आहे. वर नमूद केलेल्या सर्वे नं.चा मालकाला देण्यात आला आहे. सदर आदेशाची प्रत मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्व.बांध., नविन नाशिक, मनपा यांनी दि.२२/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थी यांचा माहिती अर्ज मा. उपअभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांच्याकडे वर्ग करण्यात आला असल्याचे कळविण्यात आले. तसेच अपीलार्थी यांनी दि.२८/०६/२०२१ रोजी माहिती अर्ज सादर केला होता. त्या माहिती अर्जात एकच माहिती मागितलेली असल्याने जन माहिती अधिकारी तथा शहर विकास अधिकारी, भूसंपादन नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी दि. १५/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थी यांना मागणी केलेली माहिती अभिलेख स्तरावर उपलब्ध नाही असे कळविले होते.

४. **प्रथम अपील** -

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २०/०४/२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २०/०४/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक, यांनी कोणतेही आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा** –

१) विद्यमान जन माहिती अधिकारी – जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना माहिती पुरविल्याचे स्पष्ट केले.

६. **निष्कर्ष** –

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना अन्य माहिती अर्जाच्या संदर्भात दिलेले वस्तुस्थितीदर्शक उत्तर आहे. मात्र प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जासंदर्भात कोणतेही उत्तर दिलेले नाही. याशिवाय प्रथम अपीलीय अधिकारी यांना देखिल सुनावणी घेऊन आदेश पारित केलेला नाही.
सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक, ता.जि. नाशिक यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा तात्काळ आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणने नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२) आयुक्त, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक, ता.जि. नाशिक यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन आदेश पारीत न करुन अधिनियमातील कलम १९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६(मा.अ) दि.१२/१२/२००७ मधील तरतुदीचे उल्लंघन केलेले असल्याची खातरजमा झाल्यास त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६/ दि.३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

३) प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक. ६५७/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ९८५८ 10 MAR 2025

प्रत :- आयुक्त, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक.